# हवामान आधारीत कृषि सल्ला
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु.,इगतपुरी,
## विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि.नाशिक.

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

**८७) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि.३०.०१.२०२६**

**जिल्हा : नाशिक**

| मागील आठवड्यातील हवामान (२१/०१/२०२५ ते २७/०१/२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (३१/०१/२०२६ ते ०४/०२/२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | दिनांक | ३१ | ०१ | ०२ | ०३ | ०४ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | १ | ० | ० | ३ | १ |
| २८.० | २८.० | २८.५ | २९.२ | २७.० | २८.५ | २९.२ | कमाल तापमान (अं.से.) | २८ | २९ | ३० | ३० | २८ |
| १३.० | १४.० | १३.५ | १३.५ | १२.५ | १३.५ | १३.५ | किमान तापमान (अं.से.) | १७ | १८ | १८ | १८ | १८ |
| अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | अ:ढगाळ | ढग स्थिती (आकाश) | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | अ: ढगाळ | ढगाळ |
| ८५ | ८५ | ८५ | ८१ | ७७ | ८३ | ८१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८२ | ८१ | ७४ | ७२ | ६९ |
| ५६ | ५८ | ५८ | ६४ | ५३ | ५८ | ६४ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५३ | ५० | ४९ | ४८ | ४७ |
| ३.६ | ४.३ | ३.५ | २.८ | ३.७ | ६.७ | ४.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६.५ | ३.० | ४.४ | ५.४ | ७.९ |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| **हवामान सारांश** | | पुढील पाच दिवसाचा अंदाज लक्ष्यात घेता नाशिक जिल्ह्यात दि. ३१ जानेवारी तसेच दि. ०३ व ०४ फेब्रुवारी २०२६ रोजी काही ठिकाणी तुरळक हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे तसेच उर्वरित दिवस हवामान कोरडे राहील. आकाश पुढील पाच दिवस अंशतः ढगाळ ते ढगाळ राहील. तसेच कमाल तापमान २८-३० डिग्री सें. व किमान तापमान १७-१८ डिग्री सें. दरम्यान राहण्याची शक्यता आहे. तसेच वा-याचा वेग ३-७ कि.मी/तास या दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| **हवामान सतर्कता/इशारा:** | | **इशारा नाही** |
| **सामान्य सल्ला** | | वेलवर्गीय भाजीपाला पिके<br>दोडका, कारले लागवड<br>चांगला निचरा होणाऱ्या, भुसभुशीत, मध्यम ते भारी जमिनीची निवड करावी. लागवडीपूर्वी शेताची चांगली मशागत करून एकरी ६ टन चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. उन्हाळी लागवड जानेवारी ते मार्च महिन्यात करावी. लागवडीसाठी दोडक्याच्या पुसा नसदार, कोकण हरिता, फुले सुचिताय कारल्याच्या फुले प्रियांका, फुले ग्रीन गोल्ड, फुले उज्ज्वला, हिरकणी, कोकण तारा या सुधारित जातींची निवड करावी. तसेच बाजारामध्ये खाजगी कंपन्यांचे विविध उत्पादनक्षम वाण उपलब्ध आहेत. कारले आणि दोडका लागवडीसाठी ताटी पद्धतीचा अवलंब करावा. लागवडीचे अंतर १.५ x १ मीटर ठेवावे. लागवडीसाठी दोडका, कारले या पिकाचे सुधारित वाणांचे ६०० ते ८०० ग्रॅम बियाणे लागते .पेरणीपूर्वी बियाण्यास २.५ ग्रॅम कार्बेंडाझिम प्रति किलो या प्रमाणात बीजप्रक्रिया करावी. माती परीक्षण अहवालानुसारच रासायनिक खतांची मात्रा द्यावी. कारली, दोडका या पिकांसाठी ताटी पद्धतीचा वापर करावा. पारंपरिक पद्धतीपेक्षा या सुधारित पद्धतीमुळे उत्पादनात वाढ मिळते. |
| **संदेश** | | **हलक्या पावसाचा अंदाज लक्ष्यात घेता पावसापासून कापणी केलेले पिक तसेच पशुधनाचे साठवलेले पशुखाद्य, चारा व कडबा याचे प्लास्टिक/ ताडपत्रीने झाकून संरक्षण करावे.** |
| **रब्बी ज्वारी** | **कणसांमध्ये दाणे भरण्याचीअवस्था** | पहिला पंधरवडा – पक्ष्यांपासून संरक्षण करावे (पक्षीथांबे /मचाण बसविणे).<br>पाण्याच्या उपलब्धतेनुसार तिसरे पाणी द्यावे व पक्षांपासून संरक्षण करावे.<br>ज्वारी पिकाची कोळपणी व खुरपणी करुन पिक तणविरहीत ठेवावे<br>उपलब्ध जमिनीतील ओलाव्याच्या स्थितीनुसार कोळपणी करावी आणि कोळपणी नंतर तण काढणी करावी. |
| **रब्बी मका** | **वाढीची अवस्था** | खत व्यवस्थापन<br>पेरणीनंतर ४० ते ४५ दिवसांनी प्रत्येकी १६ किलो नत्र (३५ किलो युरिया) प्रति एकरी द्यावे. उभ्या पिकात नत्रयुक्त खतमात्रा पिकाच्या ओळीपासून १० ते १२ सेंमी अंतरावर ओळीमधून द्यावी. एकूण शिफारशीत खतमात्रा ४८ किलो नत्र, २४ किलो स्फुरद, १६ किलो पालाश प्रति एकर अशी असून, नत्राची १.३ मात्रा आणि स्फुरद, पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी देण्याची शिफारस आहे. |
| **गहू** | **फुलोरा अवस्था / ओंबी लागणेची अवस्था** | सद्य:स्थितीत ओंब्या बाहेर पडल्या आहेत. अशावेळी वारा नसताना पाण्याची पाळी द्यावी. कारण त्यामुळे गहू लोळण्याची शक्यता असते. ओंब्या बाहेर पडल्यानंतर पिकास तुषार सिंचन पद्धतीने पाणी देऊ नये. कारण त्यामुळे गव्हाच्या दाण्यांची चकाकी कमी राहून दर्जात घट होते. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **हरभरा** | **फुलोरा ते घाटे लागणेची अवस्था** | बागायती हरभऱ्यासाठी घाटे भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे.<br>हरभऱ्यावरील घाटे अळीचा नियंत्रणासाठी रासायनिक कीटकनाशक क्लोरानट्रानिलीप्रोल १८.५ एस.सी.@ २.५ मिली किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ एस. जी.@ ४ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून (सरासरी १० अळ्या प्रती झाड आढळून आल्यास) फवारणी करावी. |
| **उन्हाळी भुईमुग** | **जमिनीची मशागत / पेरणी पूर्व तयारी** | जानेवारीच्या तिसऱ्या आठवड्यात पेरणी करता येईल अशा बेताने पेरणीपूर्व ओलीत करावे.<br>भुईमुग पिकाचे सुधारित वाण जसे फुले उन्नती, टी.ए.जी.-२४, टी.जी.-२६, टी.पी.जे.-४१, जे.एल.-५०१ खरेदी करावे.<br>उन्हाळी भुईमुगाची पेरणी<br>१५ जानेवारी ते १५ फेब्रुवारी दरम्यान करावी परंतु तापमान १८ डिग्री सिल्सिअस पर्यंत किंवा त्यापेक्षा जास्त वाढत नाही तोवर पेरणी करू नये.<br>उन्हाळी भुईमुग लागवडीसाठी हेक्टरी ५ टन शेणखत/ सेंद्रिय खत जमिनीत मिसळावे. |
| **द्राक्षे** | | सद्य स्थितीत बागांमध्ये केवडा रोगाची समस्या आढळून येण्याची शक्यता असते म्हणून द्राक्षबागेत बागेचे अवस्थेनुसार प्रतिबंधात्मक उपाय करावेत.<br><u>लागवडपूर्व माती व पाणी परीक्षण</u><br>ज्या जमिनीमध्ये द्राक्ष लागवड करणार आहोत, तेथील मातीमध्ये मुख्य व सूक्ष्म अन्नद्रव्यांचे नेमके प्रमाण किती आहे, हे जाणून घेणे आवश्यक आहे, सिंचनासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याची गुणवत्ताही जाणून घेतली पाहिजे.<br>बऱ्याच बागेमध्ये चुनखडीचे प्रमाण कमी अधिक आढळून येते. या चुनखडीच्या उपलब्धतेमुळे वेलीस अन्य अन्नद्रव्यांच्या पुरवठ्यावर मर्यादा येतात किंवा खंडित होतो. परिणामी, वेलीचे उत्पादन कमी राहते. काही परिस्थितीमध्ये वेलीचे आयुष्यही कमी होते.<br>बऱ्याच ठिकाणी बोअरवेल व विहिरीचे पाणी सिंचनासाठी वापरले जाते. अशा पाण्यामध्ये क्षारांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते. पाण्यातील अधिक क्षारांमुळे वेलीची शाकीय वाढ होत नाही, तर काही स्थितीमध्ये पानांवर स्कॉर्चिंग येते. यामुळे उत्पादनामध्ये घट येते.<br>आपल्याकडे उपलब्ध असलेल्या स्थितीमध्ये योग्य खुंटाची निवड महत्त्वाची असते. याकरिता लागवडीपूर्वी माती व पाणी तपासून घेणे गरजेचे समजावे. |
| **डाळिंब** | | <u>आंबिया बहार (जानेवारी-फेब्रुबारी पिक नियमन)</u><br><u>कीड व्यवस्थापन</u><br><u>नवीन पालवी फुटण्याची अवस्था</u><br>पहिले पाणी दिल्यानंतर १० ते १५ दिवसांनी निळे किंवा पिवळे चिकट सापळे २५ ते ३० सापळे प्रती एकर याप्रमाणे झाडाच्या सर्वात उंच फांदीपासून १० ते १५ सें.मी. खाली बांधवे. हे सापळे चिकटलेल्या किडीनुसार २० ते २५ दिवसांनी बदलावेत.<br><u>वाढीची अवस्था</u><br>ॲझाडिरॅक्टिन/ कडुनिंब तेल १% (१०,००० पीपीएम) ३ मिली किंवा करंज तेल ३ मिली किंवा वरील दोन्ही तेलांचे मिश्रण प्रत्येकी ३ मिली प्रति लिटर पाणी याप्रमाणे आवश्यकतेनुसार ७ ते १० दिवसांच्या अंतराने एक-दोन फवारण्या घ्याव्यात.<br><u>फुलधारणा/ फुलकळी येण्याची अवस्था</u><br>७ ते १० दिवसांच्या अंतराने सायअँट्रानिलीप्रोल (१०.२६ ओडी) ०.९ मिली किंवा क्लोरअँट्रानिलीप्रोल (१८.५ एससी) ०.३ मिली किंवा फ्लुबेन्डीॲमाइड + थायक्लोप्रिड (४८० एससी) ०.५ मिली अधिक स्टीकर स्प्रेडर ०.२५ मिली लिटर पाणी याप्रमाणे एक-दोन फवारण्या घ्याव्यात. |
| **आंबा** | | आंबा पिकावरील मोहराच्या संरक्षणासाठी व तुडतुडे किडीच्या नियंत्रणासाठी इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. @ ३ मिली प्रती लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटारायझीयम अनिसोप्ली किंवा व्हरटीसिलीयम लेकानी किंवा कॉन्फिडॉर @४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.<br>आंबा पिकावरील मोहराच्या संरक्षणासाठी व बुरशीच्या नियंत्रणासाठी गंधक@ ३० ग्राम प्रती १० लि. पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **कांदा** | | सद्य स्थितीत कांदा पिकात ढगाळ हवामानामुळे करपा तसेच फुलकिडीचा प्रादुर्भाव वाढू शकतो. तरी फुलकिड व करपा रोगाच्या नियंत्रणासाठी टेबुकोनाझोल १० मिली + फिप्रोनील १५ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्टीकर सोबत फवारणी करावी.<br><u>कांदा बीजोत्पादनाचे उभे पीक</u><br>पुनर्लागवडीनंतर ४० ते ६० दिवसांनी खुरपणी करावी.<br>नत्र खताचा पहिला हप्ता १२ किलो प्रति एकर या प्रमाणात लागवडीनंतर ३० दिवसांनी द्यावा.<br>नत्र खताचा दुसरा हप्ता १२ किलो प्रति एकर या प्रमाणात लागवडीनंतर ४५ दिवसांनी द्यावा.<br>पिकास जमिनीचा मगदूर, तापमान यांचा विचार करून १० ते १२ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे.<br><u>पीक संरक्षण</u><br>मॅन्कोझेब २.५ ग्रॅम अधिक प्रोफेनोफॉस १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. यामुळे पानांवरील रोग आणि फुलकिडे यांचे नियंत्रण होईल. |

दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२ ईमेल:igatpuri.amfu@gmail.com

| | | |
|---|---|---|
| **कांदा** | | पुढील फवारणी १५ दिवसांच्या अंतराने, हेक्झाकोनॅझोल १ मिली अधिक कार्बोसल्फान १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात करावी.<br>वरील फवारणीनंतर सुद्धा पानांवरील रोग आणि फुलकिडे यांचे नियंत्रण झाले नाही, तर प्रोपीकोनॅझोल १ ग्रॅम अधिक फिप्रोनील १ मिली प्रति लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी.<br>मर रोगाचा प्रादुर्भाव आढळून आल्यास, कॅप्टन किंवा कार्बेन्डाझिम किंवा थायरम २ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे द्रावणाची आळवणी करावी.<br>फुले उमलल्यानंतर बुरशीनाशक किंवा कीटकनाशक यांच्या फवारण्या करू नयेत. कारण या फवारण्यांमुळे मधमाश्यांना हानी पोहोचते. त्याचा परागीकरणावर विपरीत परिणाम होतो. |
| **टोमॅटो** | | अवशेष व्यवस्थापन<br>बरेचसे शेतकरी फळ तोडणी आणि पॅकिंगचे काम शेताच्या बांध्यावर करतात. फळ पोखरणाऱ्या अळी, पिनवर्मने खराब केलेली, तसेच रोगग्रस्त टोमॅटोचा ढीग बांधावरच ठेवतात. तेच पुढे कीड व रोगांचे आगार बनते. त्यातूनच किडींची पूर्ण वाढ झाल्यानंतर पतंग बाहेर पडतात आणि तेथे जवळच अंडी घालतात. रोगकारक सूक्ष्मजीव तर लगेच आपले प्रसारण सुरू करतात. म्हणून रोगग्रस्त, किडग्रस्त टोमॅटो बांधावर न टाकता खड्डा करून पुरून टाकावेत. |
| **पशुधन (गाय, म्हैस)** | | कासदाह होण्याची कारणे आणि उपाययोजना<br>रोग प्रतिकारक्षमता कमी असेल तर गाई, म्हशी लवकर आजारी पडतात. व्यवस्थापन आणि आहार या दोन्हीतून कासदाह आजाराला दूर ठेवता येते.<br>सडावाटे हे जीवाणू कासेत प्रवेश करीत असल्यामुळे गोठ्यातील व्यवस्थापन महत्त्वाचे ठरते. गोठ्याची रचना, स्वच्छता, गाई, म्हशींच्या सडांना जंतुनाशक द्रावणात बुडविणे, बसण्याच्या जागी वाळू, राख, लाकडाचा भुसा, चुना वापरावा.<br>दूध काढणीयंत्राची स्वच्छता राखावी, प्रत्येक गायीचे दूध काढण्याअगोदर हात धुवून घ्यावेत. जंतुनाशक द्रावणाने निर्जंतुकीकरण करावे.<br>आहार व्यवस्थापनात प्रथिने आणि ऊर्जा यांचे संतुलन, शरीराची रोग प्रतिकारक्षमता वाढविण्यासाठी सेलेनियम, जीवनसत्त्व ई तसेच झिंक आणि बायोटीनचा वापर करावा.<br>कासदाह झाल्यानंतर किंवा लक्षणे दिसून आल्यानंतर पशुवैद्यकीय मदत, खराब दुधाची योग्य विल्हेवाट लावावी.<br>गोठ्यात नवीन येणाऱ्या गाई, म्हशी जीवाणूंच्या सुप्त वाहक असू शकतात. म्हणून नवीन जनावरे पशुवैद्यकाकडून तपासून कुठलाही आजार नसल्याची खात्री करून घ्यावी. |
| **शेळी- मेंढी** | | शेळ्या-मेंढ्यांमधील देवी- हा पॉक्स विषाणूपासून शेळ्या-मेंढ्यांना होणारा अतीसंसर्गजन्य साथीचा आजार आहे. याचा प्रादुर्भाव जानेवारी-एप्रिल दरम्यान मोठ्या प्रमाणावर आढळतो. आजारामध्ये जनावरांच्या शरीरावर (कान, तोंड, कास, सड, शेपटीखाली, पोट इत्यादी) प्रथम लालसर पुरळ येते. त्यामध्ये पू होऊन ते पिवळ्या रंगाचे दिसतात. त्याचे रूपांतर खपल्यामध्ये होते. आजारामध्ये प्रौढ शेळ्या-मेंढ्यांमध्ये ५ ते १० % मरतुकीचे प्रमाण असून करडे, कोकरांमध्ये हे प्रमाण जास्त असते.<br>प्रतिबंध<br>मेंढ्यांकरिता शीप पॉक्स व शेळयांकरिता गोट पॉक्स लस बाजारामध्ये उपलब्ध आहे. लसीची रोगप्रतिकारशक्ती एक वर्षापर्यंत जनावरांच्या शरीरामध्ये राहते. याकरिता तीन महिन्यांवरील सर्व शेळ्या, मेंढ्यांना डिसेंबर-जानेवारी महिन्यात दरवर्षी न चुकता पशुवैद्यकाच्या सल्ल्याने लसीकरण करावे.<br>दोन टक्के फेनॉल किंवा एक टक्का फॉर्मेलिनच्या द्रावणाने जनावरांचे वाडे व इतर साहित्य निर्जंतुक करून घ्यावे. तसेच फ्लेम गनच्या साह्याने वाडे वरच्यावर निर्जंतुक करावेत.<br>बाधित शेळ्या-मेंढ्यांच्या संपर्कात आलेला चारा, खाद्य तसेच मृत जनावरे जमिनीमध्ये पुरून किंवा जाळून विल्हेवाट लावावी.<br>बाधित कळप किंवा शेळ्या-मेंढ्यांना किमान दीड महिना वेगळे ठेवावे.<br>नवीन खरेदी केलेल्या शेळ्या-मेंढया किमान तीन आठवडे मूळ कळपामध्ये मिसळू नयेत.<br>प्रादुर्भावग्रस्त भागामध्ये मेंढ्यांचे स्थलांतर करू नये.<br>उपचार<br>लक्षणे आढळून आल्यास प्रथम आजारी जनावर कळपातून वेगळे करावे.<br>आजार विषाणूजन्य असल्याने त्यावर प्रभावी औषधोपचार उपलब्ध नाही. इतर जीवणूंचे संक्रमण टाळण्याकरिता पाच दिवस प्रतिजैविके व वेदनाशामक औषधोपचार करावा.<br>शरीरावरील जखमा पोटॅशियम परमॅग्नेटच्या द्रावणाने स्वच्छ व निर्जंतुक करून त्यावर जंतुनाशक मलम लावावे. |

**दूरध्वनी : ०२५५३ २४४०३२** **ईमेल**:igatpuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| **कुक्कुटपालन** | | हिवाळ्यामध्ये खाद्यामधील करावयाचे बदल<br>हिवाळ्यात कोंबड्यांच्या खाद्यात योग्य बदल करावेत. हिवाळ्यामध्ये शरीर तापमान टिकविण्यासाठी व उबदारपणासाठी कोंबड्या जास्त प्रमाणात खाद्य खातात. यामुळे खाद्यावरील खर्च जास्त होतो, ऊर्जा तयार करण्यासाठी न लागणारी पोषणतत्त्वे वाया जातात.<br>खाद्यावरील खर्च कमी करण्यासाठी आणि अपव्यय टाळण्यासाठी ऊर्जायुक्त खाद्य पदार्थ जसे तेल, स्निग्ध पदार्थ, प्रथिने यांचे खाद्यातील प्रमाण वाढवावे. इतर पोषणतत्त्वांचे प्रमाण तितकेच ठेवावे.<br>आहारात ऊर्जावर्धक घटकांचे प्रमाण वाढवावे (१०० किलो कॅलरीज प्रति किलो खाद्य) आणि प्रथिनांचे प्रमाण १ ते २ टक्के कमी करणे आवश्यक असते. खाद्यामध्ये अ, क आणि ई या जीवनसत्त्वांचे प्रमाण वाढवावे.<br>एक लहान फिडर प्रती ४० पिल्लांना तर एक मोठा फिडर प्रती ३० मोठ्या कोंबड्यांसाठी वापरावा.<br>फिडरची उंची कोंबडीच्या पाठीच्या दोन इंच वर असावी. |

**स्त्रोत:**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : ग्रामीण कृषि मौसम विभाग वेधशाळा विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

**ठिकाण** : विकृसंके,इगतपुरी

**दिनांक** : ३०.०१.२०२६

**स्वाक्षरीत/-**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, इगतपुरी**

**तथा सहयोगी संशोधन संचालक,**

**वि.कृ.सं.के., इगतपुरी, जि. नाशिक**